**नाशिक महानगरपालिका ,नाशिक**
**कामगार कल्याण विभाग**
**ई कोटेशन नोटीस सुचना ( सन २०२४ -२५ व २०२५-२६)**

**कामाचे नाव :- सेवानिवृत्ती सत्कार प्रसंगी व इतर वेळी लागणा-या उतम दर्जाच्या वस्तु व सेवापुरविणे बाबत.**

**माहे** एप्रिल २०२३ ते मार्च २०२४ या कालावधी मध्ये नाशिक महानगरपालिकेतील कायम सेवेत असलेले विविध संवर्गातील अधिकारी / कर्मचारी यांचे **सेवानिवृत्ती सत्कार प्रसंगी व इतर वेळी** लागणा-या उत्तम दर्जाच्या वस्तु व सेवा पुरविणे कामी मुळ उत्पादक, उत्पादनाचे अधिकृत वितरक, विक्रेते यांचेकडुन कोटेशन पध्दतीने खालील प्रमाणे वस्तु पुरविणे करीता सर्व कारांसह कोटेशन व्दारे दर मागविण्यात येत आहे .

| अ.न. | तपशिल | वर्णन | मागणी नग संख्या (अंदाजित) |
|---|---|---|---|
| १) | स्मृतीचिन्ह | लाकडी बेस व काचेच्या बॉक्स सह ८×१० इंच नामनपाचे बोधचिन्ह असलेले गोल्डन अक्षरे मा.आयुक्त, उपआयुक्त व इतर अधिकारी पदाधिकारी यांचे नावांसहित | ५०० |
| २) | शॉल | मध्यम दर्जा,मोठी साईज ४ फूट रूंद ६ फूट लांब, आकर्षक रंग,प्युवर वुलन | ५०० |
| ३) | श्रीफळ | मोठे, पाणीदार | ५०० |
| ४) | वृक्ष रोपे प्लास्टिक कुंडीसह | वेगवेगळया प्रकारची देशी फुलांचे किंवा देशी वृक्षांचे रोपे कुंडीसह | ५०० |
| ५) | चहा व पिण्याचे पाणी | सत्कारार्थी व त्यांचे समवेत आलेले कुटुंबातील व्यक्ती आलेले पाहुणे,अधिकारी, पदाधिकारी तसेच अधिकारी /कर्मचारी यांचे करीता गरजे नुसार संपुर्ण वर्षाचे अंदाजे (२५००) व्यक्तींना | २५०० |
| ६) | फोटो | सत्कारार्थीचे सत्कार प्रसंगी प्रत्येक सत्कारथीचे फोटो काढणे | ५०० |
| | | | |

**अटीशर्ती**

१. वरील कामाचे कोटेशन पत्रक अटीशर्ती सह www.nmc.gov.in या संकेत स्थळावर दिनांक २१/०२/२०२४ ते दिनांक २९/०२/२०२४ रोजी दुपारी १२:०० वाजेपावेतो उपलब्ध आहे.
२. कोटेशन पाकीट सादर करणेची अंतिम तारीख दि. २९/०२/२०२४ रोजी दुपारी ३:०० वाजेपर्यंत राहील. मुदतीनंतर प्राप्त होणारी कोटेशन पाकीटे स्विकारली जाणार नाही.
३. कोटेशन पाकीट कामगार कल्याण विभाग राजीव गांधी भवन शरणपुर रोड नाशिक-२ येथे स्विकारण्यात येतील.
४. सदर सदरच्या कामाकरीता वेगळा वाहतूक खर्च देण्यात येणार नाही.
५. सदरचे दरपत्रक हे सर्व करासह अनुषंगीक खर्चासह दर नमुद करायचे आहे. कोणत्याही कराची जबाबदारी नाशिक महानगरपालिकेवर राहणार नाही.
६. कोटेशनधारक/एजन्सी ही नाशिक मनपा हददीतील असणे आवश्यक आहे. त्यासाठी शॉप ॲक्ट लायसन्स् /GSTनोंदणी प्रमाणपत्रावरील पत्ता विचारात घेण्यात येईल.
७. कोटेशन धारकाने दोन लिफाफे देणे आवश्यक आहे. १) तांत्रिक लिफाफा या लिफापयात पॅनकार्ड, शॉप ॲक्ट लायसन्स, GST नोंदणी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. त्या शिवाय कोटेशनचा विचार केला जाणार नाही. तांत्रिक लिफाफा पात्र असल्यावरच वित्तिय लिफाफा उघडण्यात येईल.
८. वित्तिय लिफाफा---- दर पत्रक आवश्यक
९. निवडण्यात आलेल्या कोटेशन धारकास र.रु. ३०,०००/- (प्राकलनाच्या एकूण रक्कमेच्या ) ५% सुरक्षा अनामत भरावी लागेल.
१०. कोटेशन स्विकारणे / नाकारण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांना राहील.

**Sd/-**
**उप आयुक्त (समाज कल्याण)**
**नाशिक महानगरपालिका, नाशिक**

# नाशिक महानगरपालिका, नाशिक

## कामगार कल्याण विभाग

### ई कोटेशन सुचना ( सन २०२४- २५ व सन २०२५-२६)

**कामाचे नाव :- सेवा निवृत्ती सत्कार प्रसंगी व इतर वेळी लागणा-या उत्तमदर्जाच्या वस्तू व सेवा पुरविणे बाबत.**

### सर्व साधारण अटी -शर्ती

१) कोटेशन सोबतची कोटेशनधारकाची कोणतीही अट मान्य करता येणार नाही . सशर्त कोटेशन तात्काळ रद्द करण्यात येईल .

२) कोटेशन नोटिस मध्ये नमुद कामाचे स्वरुप हे अंदाजे असुन त्यामध्ये कामाचे अनुषंगाने कमी जास्त होण्याची शक्यता आहे.

३) दिलेल्या मुदतीमध्ये संपुर्ण काम करणे / सेवा पुरविणे आवश्यक आहे काही अपरिहार्य कारणास्तव काम पुर्ण करणे शक्य नसल्यास तशी मुदतवाढ मिळणेबाबतचा आगाऊ अर्ज करणे आवश्यक राहिल. तथापी मुदतवाढ द्यावयाची किंवा कशी या बाबत महापालिकेचा निर्णय अंतिम राहील .

४) ज्यांचे कोटेशन दर मंजुर होईल त्या कोटेशनधारकास महानगरपालिकेचे लाभात र. रु. ५२०/- चे जनरल स्टँपपेपरवर रितसर करारनामा करुन द्यावा लागेल. तसेच एक सक्षम जामीनदार द्यावा लागेल.

५) जी.एस.टी करासह व अनुषंगीक खर्चासह कोटेशन दर नमुद करावयाचे आहे. कोणत्याही टॅक्सची जबाबदारी महानगरपालिकेवर राहणार नाही .

६) मुदतीत काम न केल्यास / सेवा न पुरविल्यास अशा उशिरा केलेल्या कामावर / सेवा पुरविण्याच्या रकमेवर महानगरपालिकेचे झालेले नुकसान विचारात घेऊन दंड आकारणी करण्यात येईल व सदरची रक्कम कोटेशनधारकाकडुन वसुल करण्यात येईल .

७) सदरचे मंजुर दराने कराराचे मुदतीपर्यंत वेळोवेळी गरजेनुसार कामकरणे/सेवा पुरविणे बंधनकारक राहील.

८) मुदतीत काम न झाल्यास/ /सेवा न पुरविल्यास /मुदतीत काम पुर्ण न केल्यास,सदरचे काम कोटेशनधारकाचे जबाबदारीवर इतर ठिकाणाहुन करुन घेण्यात येईल आणि त्या कामी महानगरपालिकेस मंजुर दरापेक्षा जास्त खर्च आल्यास तो कोटेशनधारकाकडुन वसुल करण्यात येईल .

९) मंजुरीनुसार काम न झाल्यास / सेवा न पुरविल्यास,काम/ सेवा नाकारण्यात येईल व त्याबाबतचा महानगरपालिकेचा निर्णय अंतिम राहील .

१०) कोणतेही काम मंजुर केलेल्या दराने कोटेशनधारकाकडुन करण्याची महानगरपालिकेवर सक्ती नाही. याबाबत कोटेशनधारकास नुकसानभरपाई मागता येणार नाही.

११) अटी /शर्तीमधील एखाद्या शर्तीबाबत काही सवलत देणे अथवा आवश्यक अशा काही जादा अटी घालण्याबाबत महानगरपालिकेस अधिकार राहील.

१२) कोटेशन दर मंजुर झालेनंतर सदरच्या कामाच्या दरात/सेवेच्या दरात काही वाढ झाल्यास वाढलेल्या दराप्रमाणे कोटेशनधारकास जादा पैसे मिळणार नाही .

१३) अटिशर्तीचा भंग केल्यास त्यांचे बिलातुन रक्कम जप्त करण्यात येईल.

१४) काही अपरिहार्य कारणास्तव देयके अदा करणेस उशिर झाल्यास त्यावर व्याज अनुज्ञेय राहणार नाही.

१५) GST नोंदणी प्रमाणपत्र शॉप अॅक्ट लायसन्स्, पॅन कार्ड, इ. कागद पत्रे स्व-साक्षंकित करुन कोटेशन सोबत जोडणे आवश्यक आहे. त्याशिवाय कोटेशन विचारात घेतले जाणार नाही.

**Sd/-**

उप आयुक्त (समाजकल्याण)
नाशिक महानगरपालिका नाशिक

सदरचे अटि शर्ती मी वाचल्या असुन सदरच्या अटी शर्ती मान्य व कबुल असुन त्याप्रमाने सेवा पुरविण्यास / काम करण्यास मी तयार आहे. त्यासाठी स्वाक्षरी करत आहे.

निविदाधारकाची सही व शिक्का

# नाशिक महानगरपालिका,नाशिक
## कामगार कल्याण विभाग
## कोटेशन फॉर्म सन २०२४-२५ व २०२५-२६

**कामाचे नाव:-** सेवानिवृत्ती सत्कार प्रसंगी व इतर वेळी लागणा-या उतम दर्जाच्या वस्तु व सेवा पुरविणे बाबत.

कोटेशन सादर करण्याची अंतिम मुदत :- दि. २९/०२/२०२४ रोजी दुपारी ३:०० वाजेपर्यंत

कोटेशनधारकाचे नाव व पत्ता :- ----------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------------------------------

संपर्क क्रमांक (मोबाईल क्रमांक/भ्रमणध्वनी क्रमांक) :--------------------------------------

उक्त प्रमाणे कामाचे अटीशर्ती नुसार नाशिक महानगरपालिकेच्या कायम सेवेत असलेले विविध संवर्गातील अधिकारी / कर्मचारी यांचा **सेवानिवृत्ती सत्कार** प्रसंगी माहे - एप्रिल २०२४ ते माहे-मार्च २०२५ व माहे - एप्रिल २०२५ ते माहे-मार्च २०२६ या दोन आर्थिक वर्षामध्ये **सेवानिवृत्ती सत्कार** प्रसंगी व इतर वेळी लागणा-या उत्तम दर्जाच्या वस्तु व सेवा पुरविणे कामी मी/आम्ही पुढील प्रमाणे सर्व करांसह दर सादर करीत आहोत.

| **अ.न** | **तपशिल** | **वर्णन** | **मागणी नग संख्या** | **प्रती नग दर(सर्व करांसह)** | **एकुण रक्कम (सर्व करांसह)** |
|---|---|---|---|---|---|
| १) | स्मृतीचिन्ह | लाकडी बेस व काचेच्या बॉक्स सह ८×१० इंच नामनपाचे बोधचिन्ह असलेले गोल्डन अक्षरे मा.आयुक्त, उपआयुक्त व इतर अधिकारी पदाधिकारी यांचे नावांसहित | ५०० | | |
| २) | शॉल | मध्यम दर्जा,मोठी साईज ४ फूट रूंद ६ फूट लांब, आकर्षक रंग,प्युवर वुलन | ५०० | | |
| ३) | श्रीफळ | मोठे, पाणीदार | ५०० | | |
| ४) | वृक्ष रोपे प्लास्टिक कुंडीसह | वेगवेगळया प्रकारची देशी फुलांचे किंवा देशी वृक्षांचे रोपे कुंडीसह | ५०० | | |
| ५) | चहा व पिण्याचे पाणी | सत्कारार्थी व त्यांचे समवेत आलेले कुटुंबातील व्यक्ती आलेले पाहुणे,अधिकारी, पदाधिकारी तसेच अधिकारी /कर्मचारी यांचे करीता गरजे नुसार संपुर्ण वर्षाचे अंदाजे (२५००) व्यक्तींना | २५०० | | |
| ६) | फोटो | सत्कारार्थीचे सत्कार प्रसंगी प्रत्येक सत्कारथीचे फोटो काढणे | ५०० | | |
| | | **एकुण** | | | |

सदर कोटेशनसोबत असलेल्या सर्व अटी शर्ती मी वाचल्या असुन मला त्या मान्य आहेत. सदर अटी शर्ती प्रमाणे सदर कोटेशनमध्ये नमुद केलेल्या दराने उक्त वस्तु व सेवा पुरविणे / पुरवठा करण्यास मी तयार आहे. त्यासाठी या कोटेशनवर स्वाक्षरी करीत आहे .

दिनांक:-

ठिकाण:- कोटेशन धारकाची सही व शिक्का